# इ-ग्रंथालयांना राज्य सरकार मदत करणार

म. टा. प्रतिनिधी

मराठी भाषा आणि ग्रंथसंपदा अतिशय उच्च स्वरुपाची असून ती जागतिक स्तरापर्यंत पोहोचावी. यासाठी बदलत्या काळानुसार इ-ग्रंथालयांचा मार्ग स्वीकारणे आवश्यक झाले आहे. या माध्यमातून उच्च अभिवृत्तीसंपन्न असलेले साहित्य पुढल्या पिढीपर्यंत पोहोचू शकेल. त्यासाठी राज्यसरकार सर्वतोपरी सहकार्य करण्याचा प्रयत्न करेल, असे मत ऊर्जामंत्री दिलीप वळसे पाटील यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या १०१ व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आमदार उल्हास पवार, प्राचार्य शिवाजीराव भोसले, द. मा. मिरासदार, शंकर वैद्य, द. ता. भोसले आणि कॉम्रेड कृष्णा मेणसे उपस्थित होते. मसापच्यावतीने देण्यात येणाऱ्या साहित्य पुरस्कारांचे प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्याहस्ते वितरण करण्यात आले.

मसापतर्फे देण्यात येणारा मसाप पुरस्कार डॉ. सरोजिनी वैद्य यांना देण्यात आला. त्यांची प्रकृती बरी नसल्याने शंकर वैद्य यांनी पुरस्कार स्वीकारला. भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार डॉ. द. ता. भोसले यांना, तर मसाप विशेष पुरस्कार कॉम्रेड कृष्णा मेणसे यांना प्रदान करण्यात आला.

## दिलीप वळसे-पाटील यांची माहिती

कार्यक्रमाला मसापचे कार्याध्यक्ष गं. ना. जोगळेकर, वि. भा. देशपांडे, मिलींद जोशी आदी उपस्थित होते.

साहित्य आणि साहित्याची सेवा करणाऱ्या व्रतस्थांची पुढल्या पिढीला अधिक गरज आहे. त्यासाठी ज्या गोष्टी आपल्याला माहीत नाहीत, त्या विषयी अधिक माहिती घेऊन तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली तिचे अध्ययन करण्याची वृत्ती वाढीस लागली पाहिजे, असे पाटील यावेळी म्हणाले.

साहित्य परिषदेच्या पुर्नउभारणीसाठी राज्य सरकारतर्फे सर्वोतोपरी सहकार्य करण्यात येईल. त्यासाठी मसापतर्फे सरकार दरबारी प्रयत्न करणार असल्याचे ते म्हणाले.

सदाशिव पेठ ही खऱ्या पुणेरी लोकांची पेठ असून तिथेच मला संस्कार आणि संस्कृतीचे दर्शन झाले. या पेठेत राहिल्याने मला अनेक दिग्गज लोक पाहायला आणि ऐकायला मिळाले, असे मत भोसले यांनी व्यक्त केले.

व्याख्यान देण्यासाठी व्याख्यात्याने पूर्ण तयारीने उभे राहणे गरजेचे असते. आणि त्यासाठी परिपूर्ण अभ्यास करण्याची तयारी असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. माणसे पाहणे हा माझा आवडता छंद असून त्यामुळे माणसाच्या वृत्ती लक्षात येतात, असेही त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र टाइम्स 28/05/07